पुढारी MY कोल्हापूर
रविवार, २१ जून २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व नंदादीप नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यास प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. संदीप पाटील यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. पी. आर. बागडे परिश्रम घेतले. यावेळी डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. कविता तिवडे आदी उपस्थित होते.